ग्रामीण रुग्णालय राजूर, ता. भोकरदन, जिल्हा जालना येथील रुग्णालयाकरीता वैद्यकीयअधिक्षक यांना “कार्यालय प्रमुख” आणि “आहरण व संवितरण अधिकारी” म्हणून घोषित करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक आरोग्य विभाग
शासन निर्णय क्रमांकः आसंअ-२०१७/ प्र.क्र.१११/ आरोग्य-४

मंत्रालय, १० वा मजला, संकूल इमारत,
गोकूळदास तेजपाल रूग्णालय आवार, मुंबई.

तारीख : १३ मार्च, २०१८.

वाचा

१) शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग क्र.ग्रारुबां-२६०७/प्र.क्र.३८३/आरोग्य-३, दि.०४.०४.२००९.

२) शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग क्र.पदनि-२०१३/प्र.क्र.१४१/आरोग्य-३, दि.१३.०५.२०१४.

३) सहसंचालक, आरोग्य सेवा रुग्णालये (राज्यस्तर), मुंबई यांचे पत्र क्रमांकः संआसे/राज्यस्तर/टे.२/कक्ष-३/ ग्रा.रु.आहरण व संवितरण/औ.मं.६ जा.क्र.८७९८-९९/१७, दि.१५.०६.२०१७.

प्रस्तावना

आरोग्य संस्थांच्या बृहत आराखडयानुसार ग्रामीण रुग्णालय, राजूर, ता. भोकरदन, जिल्हा जालनाच्या स्थापनेस उपरोक्तक्रमांक १ येथील शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे. सदर ग्रामीण रुग्णालय हे ३० खाटांचे आहे. या ३० खाटांच्या ग्रामीण रुग्णालयाकरीता उपरोक्त क्रमांक २ येथील शासन निर्णयान्वये १५ अधिकारी व कर्मचाऱ्यांची पदनिर्मिती करण्यात आली आहे. या अनुषंगाने राजूर, ता. भोकरदन येथील ग्रामीण रुग्णालयाचे कार्यालयीन कामकाज व आर्थिक व्यवहार हाताळण्यासाठी वैद्यकीय अधिक्षक, वर्ग-१, यांना “कार्यालय प्रमुख” आणि “आहरण व संवितरण अधिकारी” म्हणून घोषित करण्याबाबत विचाराधीन होती.

शासन निर्णय

मौजे राजूर, ता. भोकरदन, जिल्हा जालना येथील ग्रामीण रुग्णालयाचे कार्यालयीन कामकाज व आर्थिक व्यवहार हाताळण्यासाठी, वित्त विभागाच्या शासन निर्णय क्र.विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/२०१३/ विनियम, भाग-२, दि.१७.४.२०१५ च्या सोबतच्या परिशिष्टामधील वित्तीय अधिकार नियम पुस्तिका-१९७८, भाग- पहिला, उप विभाग- पहिला, अनुक्रमांक्र ३ येथील नियम २ अन्वये प्रदान केलेल्या प्राधिकारास अनुसरुन “वैद्यकीय अधिक्षक, वर्ग-१” यांना “कार्यालय प्रमुख” म्हणून घोषित करण्यात येत आहे. तसेच, महाराष्ट्र कोषागार नियम, १९६८ मधील नियम क्र.१५६ मधील

तरतूदीनुसार वैद्यकीय अधिक्षक, वर्ग-१, यांना "आहरण व संवितरण अधिकारी" म्हणून घोषित करण्यात येत आहे.

२. सदर शासन निर्णय, वित्त विभागाने त्यांचा अनौपचारिक संदर्भ क्र.५७/१८/कोषा. प्रशा-५, दि.२६.०२.२०१८ अन्वये दिलेल्या मान्यतेस अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०३०७१२५३४०६५१७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Pradip M Balkavde

Digitally signed by Pradip M Balkavde
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Public Health Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=8db6aab31faca2f1a89698a28c947 03436c07cda664672d20607766dc59d345b , serialNumber=ed0fa40788bb5c0d7f76b86 9fa2e5835af215c6a80eae8f70eaf87b0cf68 d63f, cn=Pradip M Balkavde
Date: 2018.03.13 15:48:51 +05'30'

प्र. मो. बलकवडे
अवर सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग
महाराष्ट्र शासन

प्रत,

१. संचालक, आरोग्य सेवा आयुक्तालय, मुंबई.
२. सहसंचालक, आरोग्य सेवा, रुग्णालये (राज्यस्तर), मुंबई
३. सहाय्यक संचालक (लेखा व लेखापरिक्षा),आरोग्य सेवा, पुणे.
४. सहसंचालक, आरोग्य सेवा (अर्थ व प्रशासन), मुंबई/ पुणे.
५. उपसंचालक, आरोग्य सेवा (औरंगाबाद मंडळ), औरंगाबाद.
६. जिल्हा कोषागार अधिकारी, जालना.
७. जिल्हा शल्य चिकित्सक, जालना.
८. महालेखापाल १ / २, महाराष्ट्र (लेखा व लेखापरिक्षा) / लेखा व अनुज्ञेयता, मुंबई/ नागपूर.
९. वित्त विभाग (विनियम कार्यासन), मंत्रालय, मुंबई.
१०. कार्यासन अधिकारी (अर्थसंकल्प), सा.आ.वि., मंत्रालय, मुंबई.
११. निवडनस्ती (आरोग्य-४).